भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/१२/२०१७

**१) घरातील मागच्या दाराची कडी तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीण्यांची चोरी . :—**

दिनांक २०/१२/२०१७ चे २३.०० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने कोणीही नसल्याची संधी साधुन पाहुन फिर्यादीचे घराचे मागच्या दाराची कडी तोडुन घरात आत प्रवेश करुन माच घरात ठेवलेली लोखंडी टिनाचे आलमारीतील लॉकर मधील एक जोडी सोन्याचे टॉप्स वजन ४ ग्रॅम, सोन्याच्या मण्याची गरसोली व पदक वजन दिड तोडे, एक सोन्याची जिवती वजन १ ग्रॅम, सोन्याचे मणी-१० नग व नगदी ५००/—रु. असा एकुण २९,५००/—रु. चा माल तसेच गावातील विकास पंढरी देशमुख यांचे घरातील आलमारीत ठेवलेला १० ग्रॅम, सोन्याचा गोप वजन २.५ ग्रॅम, असा एकुण १४,०००/—रु. चा माल असे दोन्ही मिळुन एकुण ४३,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी विनोद राजाराम लांजेवार वय ४५ वर्ष, रा. वाही यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पवनी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :—**

दिनांक २०/१२/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी तिर्थराज दादु नागपुरे वय ५० वर्ष रा. सुकळी नकुल याचा मोठा भाऊ मधुकर दादु नागपुरे वय ५९ वर्ष, रा. सुकळी नकुल हा आपल्या घराकडे डांबरी रोडने सायकलने जात असता बफेरा कडुन सुकळी नकुल कडे विरुध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाचे सायकलला धडक मारुन जखमी करुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १३४(ब),१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बोरकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) चारचाकी वाहनाच्या धडकेत मोटार सायकल चालक जखमी . :—**

दिनांक २१/१२/२०१७ चे १८.३० वाजता दरम्यान यातील जखमी हसीन मनोहर कोचे वय २८वर्ष, रा. वारपिंडकेपार हा राज्य मार्ग क्र. ३५५ वरुन सायकलने जात असता यातील अज्ञात आरोपी चार चाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन सायकलला चुल्हाळ बौध्द विहार समोर येथे धडक मारुन हसीन कोचे यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. जटाळ यांचे चौकशी वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १३४(ब),१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि जटाळ पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) एटीएम खात्यातुन पैसे काढुन महिलेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/१२/२०१७ चे ०१.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीचे मोबाईल क्र. वर त्याचे मोबाईल वरुन कॉल करुन एटीएम ला आधार कार्ड लिंक करायचे आहे एसबीआय बॅकेतुन बोलतो असे सांगुन विश्वासात घेवुन आधार कार्ड नंबर फिर्यादीने आरोपीला दिला असता फिर्यादीचे एटीएम नं. घेवुन त्यातुन नगदी ४,०००/—रु. ची उचल करुन फसवणुक केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(क) आय. टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सिडाम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) रोहीत्र ट्रान्सफार्मचे किटकॅट टॉप चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १९/१२/२०१७ चे १२.३० ते २०/१२/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील म.रा.वि.वि क्र. चे रोहीत्र ट्रान्स्फार्मचे फ्युजकिटकॅट टॉप कोणीतरी अज्ञात ईसमाने ३०० ए चे एकुण १२ किटकॅट टॉप, २०० ए चे एकुण २७ किटकॅट टॉप, १०० ए चे एकुण ६ किटकॅट टॉप एकुण ४५ किटकॅट टॉप किंमती ७३५०/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी धम्मदिप महानंद फुलझेले वय ३८ वर्ष, अतीरिक्त कार्यकारी अभियंता म. रा. वि. वि. कं. मर्या. उप विभाग भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३६ भा.वि. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे बेतात मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २१/१२/२०१७ चे २०.५० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे अस्तीत्व अंधारात लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे बेताने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. खैरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

७) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २१/१२/२०१७ चे १७.३० ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोर वाहन आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

८) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी .   :—

दिनांक २१/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनग, वरठी,  लाखांदुर  व दिघोरी येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४८ लिटर हातभट्टी दारू किंमती २७००/—रु. तसेच जुगारातुन किंमती ६२५/—रु. असा एकुण /रु. चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २१/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी — ०२ तीन सिटर वाहनांवरती— ०९ केसेस व ईतर वाहनांवरती —५८ केसेस करण्यात आलेले आहे.

22.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस  उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

psr

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.